# बीकॉम, बीएस्सीसाठी यंदापासून केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पद्धत

## शनिवारपासून ऑनलाईन अर्ज भरण्यास प्रारंभ; कुलगुरु डॉ. फडणवीस यांची माहिती

**सोलापूर / प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बीकॉम आणि बीएस्सी प्रथम वर्ष प्रवेशासाठी केंद्रीय पद्धत अवलंबण्यात येणार आहे. यानुसार प्रवेशासाठी शनिवार (दि.८ जून) पासून ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याची माहिती कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी दिली.

बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून आता पुढील अभ्यासक्रमांसाठी सर्वत्र प्रवेशाची लगबग सुरू होत आहे. शहरातील महाविद्यालयांमध्ये बीकॉम आणि बीएस्सी प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. यासंदर्भात शहरातील संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेऊन त्यात केंद्रीय पद्धतीविषयी रूपरेषा ठरविण्यात आली आहे. गुणवत्तेनुसार बारावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे नियोजन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना दि.८ ते १६ जून या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यानंतर पहिल्यांदा भाषिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी २० जूनला प्रकाशित करण्यात येईल. या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना २२ जूनपर्यंत प्रवेश निश्चित करण्यात येईल. खुल्या संवर्गातील पहिली गुणवत्ता यादी २६ जूनला प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार २९ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. दुसरी गुणवत्ता यादी २ जुलैला प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच दिवशी विद्यापीठामध्ये प्रवेशासंदर्भात विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येईल. या गुणवत्ता यादीनुसार ५ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. राखीव प्रवर्गातील गुणवत्ता यादी ८ जुलैला प्रकाशित करण्यात येईल. त्यानुसार १२ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. यावेळीही विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येईल. या ऑनलाईन प्रक्रियेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करावा व महाविद्यालय आणि विद्यापीठाला सहकार्य करण्याचे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. एस. आय. पाटील यांनी केले आहे.

### बीएसाठी थेट मिळणार प्रवेश



विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पद्धतीमध्ये बीएला वगळण्यात आले आहे. महाविद्यालयांनी गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना याकरिता प्रवेश द्यावा. एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी महाविद्यालयांनीही काळजी घ्यावी. गुणवत्तेनुसारच प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात येईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी दिली.